ePaper

## “4 जूननंतर अजित पवार गटाला खिंडार पडणार”: मेहबूब शेख



|| वर्ष - 7 | अंक - 341 || UDYAM-MH-26-0158827 ||

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 1 जून 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

**आतील पानांत**

- आझमने मोडला कोहलीचा विक्रम
- विकी ‘छावा’च्या शूटिंगमध्ये व्यस्त!
- छगन भुजबळांना घरचा आहेर!
- कर्तृत्व दाखवायला हिंमत लागते

## विधानसभा निवडणुकीसाठी सर्वच मतदारसंघातून उमेदवार उभे करणार

# महायुती-मविआचं टेन्शन वाढलं!



## जरांगेंचं ठरलं; 288 उमेदवार उभे करणार

| पुणे | महाईन्यूज

**लोकसभा निवडणुकीचा धुरळा बसला असून आता उत्सुकता ४ जूनला होणाऱ्या मतमोजणीची आहे. त्यातच लोकसभा निवडणुकीत तटस्थ राहणाऱ्या मनोज जरांगे यांनी विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची तयारी सुरु केली आहे. विधानसभा निवडणुकीसाठी सर्वच मतदारसंघातून 288 उमेदवार उभे करणार असल्याची घोषणा मनोज जरांगे यांनी केली आहे.**

पुणे न्यायालयात शुक्रवारी मनोज जरांगे एका खटल्यासंदर्भात आले होते. त्यानंतर, पत्रकारांशी बोलताना त्यांनी लोकसभा निवडणूक निकाल लागल्यानंतर 4 जूननंतर उपोषण करणार असल्याचे स्पष्ट केले. त्यासोबतच विधानसभा निवडणूक लढवण्यासंदर्भात त्यांनी मोठी घोषणा केली. मराठा आरक्षणासाठी लढा देणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांनी लोकसभा निवडणुकीत थेट सक्रीय सहभाग घेतला नाही. कुणाला पाडायचंय त्याला पाडा, असे आवाहन त्यांनी केले होते. जरांगे यांच्या आंदोलनाचा प्रभाव काही भागात जाणावला. परभणी, जालना आणि बीड लोकसभा मतदारसंघात त्यांच्या आंदोलनाचा परिणाम दिसून आला.

### कार्यकर्त्यांनी केला जल्लोष

येत्या काळात जर मराठा समाजाला (MARATHA RESERVATION) ओबीसीतून आरक्षण मिळालं नाही, तर विधानसभेला 288 मतदारसंघातून उमेदवार उभे करणार असल्याचे सांगितले. त्यासोबतच कुणबी आणि मराठा एकच आहेत, त्यामुळे जर ओबीसीतून आरक्षण दिले नाही. तर, विधानसभेला 288 मतदारसंघात उमेदवार उभे करण्याची घोषणा त्यांनी केल्यानंतर कार्यकर्त्यांनी यावेळी एकच जल्लोष केला.

### ‘जातीवाद मान्य नाही’

मनोज जरांगे पाटील यांनी जातीवाद आपल्याला मान्य नाही, मी दोन्ही समाजाला शांत राहण्याचे आवाहन केले असल्याचे सांगितले. मी जातीविषयी एकदाही बोललो नाही, मी ओबीसी बांधवाला कधीही चुकीचं बोललो नाही. नेतेच काहीही बोलतात, असे म्हणत जरांगे यांनी बीडमधील तणावावर भाष्य करणे टाळले.

### ओबीसीतून आरक्षण मिळणार नाही

**मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण मिळालं नाही तर आम्ही 288 जागांवर उमेदवार उभे करू असं मनोज जरांगे यांनी म्हंटलं आहे. आता, जरांगेंच्या विधानावर आमदार गोपीचंद पडळकर यांनाही प्रतिक्रिया दिली आहे. जरांगे यांना जी काही भूमिका घ्यायची तो त्यांचा प्रश्न आहे, मात्र सरकारने आणि न्यायालयाने त्यांना सातत्याने सांगितले आहे की, त्यांना ओबीसीतून आरक्षण देता येणार नाही. त्यामुळेच त्यांना स्वतंत्र आरक्षण दिले आहे, असं पडळकर यांनी म्हटले. तर धनगर आरक्षण सुप्रीम कोर्टात अडकले आहे, मात्र सरकार आणि देवेंद्र फडणवीस यांच्यासारखा कायदेतज्ज्ञ नेता आमच्याकडे असल्याने त्यांनी धनगर आरक्षण संदर्भात आमच्या पाठीशी उभं राहण्याचे आश्वासन दिले असल्याचे गोपीचंद पडळकर यांनी म्हंटले आहे.**

---

## पोर्शे अपघात प्रकरणी क्राईम ब्रँच ॲक्शन मोडवर

## आता अल्पवयीन आरोपीचीच चौकशी

| चाकण |

**महाईन्यूज | प्रतिनिधी|**

कल्याणीनगर येथे पोर्शे कारने अपघात करून दोन युवकांच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या अल्पवयीन असलेल्या पण मुख्य आरोपीची उद्या शनिवारी (ता. १ जून) चौकशी करण्यात येणार आहे. यासाठी पुणे गुन्हे शाखेला थेट बाल न्याय हक्क मंडळाने परवानगी दिली आहे. या चौकशीत अपघातप्रकरणी आणखी



काही खळबळजनक खुलासे होण्याची शक्यता आहे. पुण्यातील अपघात प्रकरणातील आरोपी अल्पवयीन मुलाला बाल सुधार गृहात ठेवले आहे. त्याची आतापर्यंत कुठल्याही प्रकारची चौकशी करण्यात आलेली नाही. मात्र अपघात प्रकरणाच्या अधिक तापासाठी त्याची चौकशीसाठी गुन्हे शाखेने बाल न्याय हक्क मंडळाकडे परवानगी मागितली होती. मंडळाने त्याची दोन तास चौकशीसाठी परवानगी दिल्याची माहिती आहे.

दरम्यान, ही चौकशी होताना अल्पवयीन आरोपीचे पालकांची उपस्थित अपेक्षित आहे. मात्र त्याचे वडील पोलिस कोठडीत तर आई अज्ञातवासात आहे. तर त्यांच्या आजोबाही तुरुंगात आहेत. त्यामुळे त्याची चौकशी बाल न्याय हक्क मंडळाचा एक सदस्य उपस्थित असणार आहे.

### आरोपीच्या चौकशीची परवानगी

याप्रकरणातील आरोपी अल्पवयीन असल्याने त्यांची चौकशी करण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी करणारे पत्र पुणे पोलिसांनी बाल न्याय मंडळाकडे दिले होते. त्यानुसार आता बाल न्याय मंडळाने पुणे पोलिसांनी आरोपीच्या चौकशीची परवानगी दिली आहे. उद्या पुणे पोलिसांकडून अल्पवयीन आरोपीची चौकशी करण्यात येणार आहे.

# तरुणीला जमिनीत गाडण्याचा प्रयत्न!

## 30 जणांनी जेसीबीतून तरुणीच्या अंगावर टाकली माती

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्यातून एक धक्कादायक माहिती समोर येत आहे. पुण्याच्या राजगड कोंढवळे गावात जमिनीच्या वादातून 22 वर्षीय तरुणीला जमिनीत गाडण्याचा प्रयत्न करण्यात आल्याची घटना उघडकीस आली आहे.**

या प्रकरणी पोलिसांनी चार आरोपींविरोधात 307 कलमअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. संभाजी खोपडे, तानाजी खोपडे, बाळू भोरकर, उमेश जयस्वाल या चार जणांवर जीवे मारण्याचा प्रयत्न, शिवीगाळ धमकावणे यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कोंढवळे गावात जमिनीच्या वादातून 22 वर्षीय तरुणीला जमिनीत गाडण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप संबंधीत तरुणीने आणि तिच्या आईने केला होता. ट्रॅक्टर आणि जेसीबी घेऊन दावा न्यायप्रविष्ट असलेल्या जमिनीचा बेकायदेशीर पध्दतीने ताबा घेण्यासाठी आलेल्या 25 ते 30 जणांनी जेसीबीच्या सहाय्याने अंगावर माती टाकून तरुणीला जमिनीत गाडण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप तिने आणि तिच्या घरच्यांनी केला आहे. तरुणीने केलेल्या आरोपानुसार, नागरिक पोलिसांसह जमिनीचा ताबा घेण्यासाठी आले असताना तरुणी आणि त्या नागरिकांमध्ये वाद झाला होता. त्यानंतर ही घटना घडली आहे. या



घटनेचा व्हिडिओ सध्या व्हायरल झाला आहे. व्हिडिओत तरुणी कंबरेपर्यंत मातीमध्ये गाडली गेली असल्याचं दिसत आहे. तरुणीने घडलेल्या घटनेबाबत वेल्हा पोलीस स्टेशनमध्ये रीतसर लेखी तक्रार केली आहे. त्यानंतर राजगड पोलिस स्थानकात गुन्हा नोंद करण्यात आला होता. तसंच, या प्रकरणात 10 ते 12 जणांवर गुन्हा दाखल होण्याची शक्यता आहे. 2006 मधल्या प्रकरणात तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी एका जागेचे भूसंपादन केले.

मात्र, त्या जागेचा मोबदला या पीडित तरुणीच्या कुटुंबीयांना मिळाला नाही. त्यामुळं त्यांनी जागेवरील ताबा सोडण्यास नाकार दिला. तसंच, ज्यांनी ही जागा घेतली आहे त्या जागेच्या मालकाने

### तरुणी आणि नागरिकांमध्ये वाद

जमिनीच्या वादातून 22 वर्षीय तरुणीला जमिनीत गाडण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप संबंधीत तरुणीने आणि तिच्या आईने केला होता. ट्रॅक्टर आणि जेसीबी घेऊन दावा न्यायप्रविष्ट असलेल्या जमिनीचा बेकायदेशीर पध्दतीने ताबा घेण्यासाठी आलेल्या 25 ते 30 जणांनी जेसीबीच्या सहाय्याने अंगावर माती टाकून तरुणीला जमिनीत गाडण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप तिने आणि तिच्या घरच्यांनी केला आहे. असताना तरुणी आणि त्या नागरिकांमध्ये वाद झाला होता.

बळजबरीने ताबा घेण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी 22 वर्षीय तरुणीला गाडण्याचा प्रकार केला. तसंच, तरुणीच्या अंगावर ट्रॅक्टर आणि जेसीबीच्या सहाय्याने माती टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला. या प्रकरणी पीडित तरुणीच्या कुटुंबीयांनी पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. धक्कादायक म्हणजे, जमिनीचा ताबा घेण्यासाठी मुंबईवरुन गुंड मागवल्याचाही प्रकार समोर आला आहे. दरम्यान, पोलिसांनी या प्रकरणात वापरण्यात आलेला ट्रॅक्टर आणि जेसीबीदेखील जप्त करण्यात आले आहेत. रोपींविरोधात 307 कलमअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. संभाजी खोपडे, तानाजी खोपडे, बाळू भोरकर, उमेश जयस्वाल या चार जणांवर जीवे मारण्याचा प्रयत्न, शिवीगाळ धमकावणे यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पोलीस अल्पवयीन आरोपीची चौकशी करणार

## पोर्श कार अपघात प्रकरण: बाल न्याय मंडळाने दिली परवानगी

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्यातील कल्याणीनगर भागात एका अल्पवयीन मुलाने आलिशान पोर्श कारने दोघांना चिरडल्याची घटना काही दिवसांपूर्वीच घडली होती. हे प्रकरण अद्यापही चर्चेत आहे. याप्रकरणी आता रोज नवीन कारवाई करण्यात येत आहे. दरम्यान, आता पुणे पोलीस अल्पवयीन आरोपीची चौकशी करणार असल्याचे पुढे आलं आहे. बाल न्याय मंडळाने पुणे पोलिसांनी ही परवानगी दिली आहे.**

याप्रकरणातील आरोपी अल्पवयीन असल्याने त्यांची चौकशी करण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी करणारे पत्र पुणे



पोलिसांनी बाल न्याय मंडळाकडे दिले होते. त्यानुसार आता बाल न्याय मंडळाने पुणे पोलिसांनी आरोपीच्या चौकशीची परवानगी दिली आहे. उद्या पुणे पोलिसांकडून अल्पवयीन आरोपीची चौकशी करण्यात येणार आहे. बाल न्याय मंडळाने यासाठी २ तासांचा वेळ पुणे पोलिसांना दिला आहे. अल्पवयीन चालकाला बालसुधारगृहात ५ जूनपर्यंत ठेवण्यात आलं आहे. दरम्यान, पुणे अपघातप्रकरणात मूळ आरोपी अल्पवयीन असल्याने त्याच्या वडिल आणि आजोबांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांना आज पुणे जिल्हा न्यायालयाने १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. तसेच या प्रकरणातील अल्पवयीन आरोपी मुलाच्या रक्ताच्या नमुन्यामध्ये फेरफार केल्याप्रकरणी ससून रुग्णालयाचे डॉ अजय तावरे, डॉ श्रीहरी हाळनोर आणि शिपाई अतुल घटकांबळे यांना ५ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. याशिवाय या प्रकरणात आरोपीच्या आईचाही समावेश असल्याची बाब पुढे आली आहे. १७ वर्षीय आरोपीच्या आईने मुलाचे रक्त नमुने बदलण्यासाठी स्वतःचे रक्त ससून रुग्णालयाला दिले असल्याचे समोर आले आहे. रक्त नमुने बदलण्यामध्ये डॉ. श्रीहरी हळनोरचा प्रमुख सहभाग होता. हळनोरनेच आईचेही रक्त नमुने घेतले असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. डॉ. अजय तावरे आणि डॉ. हळनोर यांच्या अटकेनंतर त्या बेपत्ता झाल्या आहेत. पोलीस त्यांचा शोध घेत

### हळनोरनेच आईचेही रक्त नमुने घेतले

आहे. याशिवाय या प्रकरणात आरोपीच्या आईचाही समावेश असल्याची बाब पुढे आली आहे. १७ वर्षीय आरोपीच्या आईने मुलाचे रक्त नमुने बदलण्यासाठी स्वतःचे रक्त ससून रुग्णालयाला दिले असल्याचे समोर आले आहे. रक्त नमुने बदलण्यामध्ये डॉ. श्रीहरी हळनोरचा प्रमुख सहभाग होता. हळनोरनेच आईचेही रक्त नमुने घेतले असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे

आहेत.बी.जी. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व ससून रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. विनायक काळे यांनी प्रकरणाचे गांभीर्य लक्षात न घेता संस्थाप्रमुख म्हणून या प्रकरणाकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे त्यांना तात्काळ सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आलं आहे.एएनआयने पुणे पोलिसांच्या हवाल्याने दिलेल्या वृत्तानुसार, याप्रकरणातील आरोपी अल्पवयीन असल्याने त्यांची चौकशी करण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी करणारे पत्र पुणे पोलिसांनी बाल न्याय मंडळाकडे दिले होते. त्यानुसार आता बाल न्याय मंडळाने पुणे पोलिसांनी आरोपीच्या चौकशीची परवानगी दिली आहे. उद्या पुणे पोलिसांकडून अल्पवयीन आरोपीची चौकशी करण्यात येणार आहे. बाल न्याय मंडळाने यासाठी २ तासांचा वेळ पुणे पोलिसांना दिला आहे. अल्पवयीन चालकाला बालसुधारगृहात ५ जूनपर्यंत ठेवण्यात आलं आहे. दरम्यान, पुणे अपघातप्रकरणात मूळ आरोपी अल्पवयीन असल्याने त्याच्या वडिल आणि आजोबांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांना आज पुणे जिल्हा न्यायालयाने १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.मुलाच्या रक्ताच्या नमुन्यामध्ये फेरफार केल्याप्रकरणी ससून रुग्णालयाचे डॉ अजय तावरे, डॉ श्रीहरी हाळनोर आणि शिपाई अतुल घटकांबळे यांना ५ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली.

# मिळकतकर सवलत योजनेला मुदतवाढ द्या!

## आमदार महेश लांडगे यांची आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे मागणी

। पिंपरी।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील मिळकतधारकांना मालमत्ता कर भरण्यासाठी सवलत योजनेला किमान महिनाभर मुदतवाढ द्यावी. तसेच, अधिकाधिक मिळकतधारकांना कर भरण्यासाठी प्रोत्साहन द्यावे, अशी मागणी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.**



याबाबत महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना निवेदन दिले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड महापालिका कर संकलन विभागाकडून मालमत्ता कर वसुली मोहीम सक्षमपणे राबवली जात आहे. शहरातील मिळकतधारकांनी नियोजित वेळेत कर भरणा करावा आणि त्यांना सवलत मिळावी. या करिता विविध योजना सुरू केल्या आहेत.

महापालिकेच्या विविध कर सवलतींचा लाभ घेण्यासाठी मालमत्ता धारकांची कर संकलन कार्यालयात मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे. कर आकारणी व कर संकलन विभागाने 2024-25 या आर्थिक वर्षातील पावणेदोन महिन्यातच अडीचशे कोटी रुपयांचा मालमत्ता कर वसूल केला आहे, ही बाब निश्चितच कौतुकास्पद आहे. दि. ३१ मे पर्यंत मिळकतकर भरणा करणाऱ्यांना सुमारे ५ टक्के आणि ऑनलाईन व रोख स्वरुपात कर भरणार कारणाऱ्या मालमत्ताधारकांना ५ ते २० टक्क्यांपर्यंत विविध कर सवलती देण्यात येत आहेत.

त्यामुळे आर्थिक वर्षाच्या सुरुवातीलाच कर भरण्यास अनेक मालमत्ताधारक प्राधान्य देतात.

सध्या मे महिन्याच्या शाळेच्या सुट्ट्या आणि लोकसभा निवडणुकांच्या कामकाजामुळे प्रशासकीय यंत्रणेवर ताण होता, असेही आमदार लांडगे यांनी म्हटले आहे. महापालिकेच्या वतीने कर संकलनासाठी 17 झोन आहेत. तसेच ऑनलाईनही सुविधा उपलब्ध आहे. मात्र, अनेक नागरिक रोखीने कर भरत आहेत. शाळांना सुट्ट्या असल्यामुळे अनेक मिळकतधारकांनी कर भरणा केलेला नाही. ३१ मे हा सलवतीचा शेवटचा दिवस असल्यामुळे कर सवलत योजनेपासून अनेक मिळकतधारक वंचित राहणार आहेत. त्यामुळे या योजनेला मुदतवाढ द्यावी, अशी मागणी आमदार लांडगे यांनी केली आहे.



> “ मालमत्ता कर भरणा सवलत योजनेला पिंपरी-चिंचवडकर चांगला प्रतिसाद देत आहेत. त्यामुळे विक्रमी मिळकतकर वसुली होते. दि. ३१ मेनंतर नागरिकांना सवलत मिळणार नाही. त्यामुळे शेवटच्या दोन दिवसांमध्ये कर संकलन केंद्रावर गर्दी होते. अनेक मिळकतधारकांना अद्याप बीले मिळालेली नाहीत, तसेच, ऑनलाईन कर भरणा करण्यासाठी तांत्रिक अडचणी येतात, अशाही तक्रारी आहेत. त्यामुळे मालमत्ता कर सूट योजनेला किमान महिनाभर मुदतवाढ द्यावी आणि अधिकाधिक मालमत्ताधारकांना दिलासा द्यावा, अशी मागणी प्रशासनाकडे केली आहे.
>
> **– महेश लांडगे,**
> आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# आरटीईच्या ऑनलाइन अर्जासाठी पालकांची धावाधाव

## प्रवेश प्रक्रियेला चांगला प्रतिसाद, शहरातील सुमारे 10 हजार पालकांनी भरले अर्ज

। पिंपरी ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**न्यायालयाच्या आदेशानुसार आरटीई प्रवेश प्रक्रियेत आता खासगी विनाअनुदानित इंग्रजी माध्यमाच्या शाळा समाविष्ट आल्या आहेत. त्यामुळे, पूर्वी ऑनलाइन अर्ज सादर केलेल्या पालकांनीही आता आपल्या पाल्यासाठी नव्याने अर्ज भरला असून, प्रवेश प्रक्रियेला त्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला आहे. आज (ता.३१) शेवटच्या दिवशी शहरातील सुमारे १० हजार पालकांनी अर्ज भरले..**




मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार कायद्यानुसार मोठ्या खासगी इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये गरीब विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश दिला जातो. त्यासाठी २५ टक्के जागा राखीव ठेवण्यात येतात. यात यावर्षी शिक्षण विभागाने बदल करून प्रवेश प्रक्रियेतून इंग्रजी माध्यमांच्या शाळा वगळल्या होत्या. जिल्हा परिषद व खासगी अनुदानित शाळांचा समावेश करून प्रक्रिया सुरू केली होती. मात्र, त्यावर काही संघटनांनी न्यायालयात धाव घेतली होती. त्यानंतर, ऑनलाइन पद्धतीने चालणारी ही प्रक्रिया थांबवण्यात आली होती. परंतु, आता न्यायालयाच्या निकालानंतर पुन्हा एकदा इंग्रजी शाळांमध्ये आपल्या पाल्याला प्रवेश घेऊन देण्याची संधी पालकांना मिळाली आहे. त्यामुळे, १७ ते ३१ मेपर्यंत पालकांनी आरटीई प्रवेशासाठी गर्दी केली होती.

### 4 जून पर्यंत मुदतवाढ

उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सुधारित आरटीई प्रवेश प्रक्रिया नव्याने सुरू करण्यात आली आहे. पालकांना आपल्या पाल्याचा आरटीई प्रवेशाचा अर्ज भरण्यासाठी ३१ मे पर्यंत मुदत देण्यात आली होती. मात्र, असंख्य पालक आरटीई प्रवेशाचा अर्ज भरू शकले नव्हते. त्यामुळे, आरटीई प्रवेश प्रक्रियेत अर्ज भरण्यासाठी येत्या ४ जूनपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. पालकांना ४ जूननंतर कोणत्याही परिस्थितीत पाल्याचा अर्ज भरण्यास मुदतवाढ दिली जाणार नाही, याची सर्व पालकांनी नोंद घ्यावी, असे पत्र राज्याचे प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी प्रसिद्ध केले आहे.

### ‘एन्ट्री पॉइंट’वरच प्रवेश देणे बंधनकारक

आरटीईमधील तरतुदींनुसार संबंधित शाळेच्या ‘एन्ट्री पॉइंट’वरच प्रवेश देणे शाळांवर बंधनकारक आहे. त्यानुसार, ज्या शाळांमध्ये नर्सरी आहे, त्या शाळांमध्ये नर्सरीत किंवा ज्या शाळा पहिलीपासून सुरू होतात, अशा शाळांमध्ये पहिलीत प्रवेश देणे आवश्यक आहे. त्यानुसार, शिक्षण संचालनालयाने शाळांकडून त्यांच्या ‘एन्ट्री पॉइंट’विषयीची माहितीही मागवून घेतली होती. यामध्ये ‘एन्ट्री पॉइंट’ असलेल्या वर्गात उपलब्ध असलेल्या जागांच्या तपशीलाचा समावेश होता. या माहितीनुसार एकूण प्रवेश क्षमतेच्या २५ टक्के जागांवर ‘आरटीई’ अंतर्गत प्रवेश दिले जाणार होते. त्याप्रमाणे शाळांनी आपली माहिती शिक्षण संचालनालयाकडे पाठवली होती. प्रवेश प्रक्रिया राबविताना नर्सरी आणि पहिली असे दोन्ही वर्ग उपलब्ध असलेल्या शाळांमध्ये फक्त नर्सरीतच प्रवेश देणे अपेक्षित होते.

> “ “पालकांनी प्रवेश घेताना संबंधित शाळा मान्यताप्राप्त आहे का ? याची खातरजमा करावी. अर्ज दाखल झालेल्या विद्यार्थ्यांची लॉटरी पद्धतीने निवड करण्यात येईल. त्यासाठी उपलब्ध जागांची एकदाच निवड करण्यात येईल.
>
> **-संगीता बांगर,**
> प्रशासन अधिकारी (प्राथमिक), पिंपरी-चिंचवड महापालिका.

# ‘विशेष वागणुकी’ला मुदतवाढ नाही!




**न्यायदेवता’ म्हणून जगभर ज्या प्रतिमेला मान्यता मिळालेली आहे, ती प्रतिमा बदलून आता ध्वज-दंड आणि सूत्रधारी अशा सिंहमुखी पुरुषाची प्रतिमा वापरावी असे प्रयत्न महाराष्ट्र-गोव्यातील वकिलांनी हल्लीच सुरू केले असले किंवा त्याहीआधी २०२२ मध्येच ‘न्यायदेवतेच्या जागी भारतीय प्रतीक म्हणून भगवान चित्रगुप्त यांची प्रतिमा वापरा’ असा आग्रहदेखील उत्तर प्रदेशातील वकिलांनी थेट पंतप्रधानांकडे मांडून झाला असला...**

री स्वातंत्र्योत्तर काळापासून भारतीय न्यायपालिका ही नेहमीच स्वत:च्या बुद्धीने, स्वत:च्या गतीने चाललेली आहे, हे या अशा प्रतिमाबदलाचा आग्रह धरणाऱ्या वकीलबाबूंनाही अमान्य करता येणार नाही. त्यामुळेच एखाद्या निर्णयावर टीका जरूर होते, पण त्याच प्रकरणातील दुसरा निर्णय टीकाकारांचेही समाधान करणारा ठरतो. या दोन्ही निर्णयांच्या वेळी न्यायपालिकेने टीकाकारांची पर्वा केलेली नसते, हे सर्वांत मोठे वैशिष्ट्य! दिल्लीचे मुख्यमंत्री आणि ‘आम आदमी पक्षा’चे संस्थापक-प्रमुख अरविंद केजरीवाल यांच्या जामिनास तथाकथित ‘वैद्याकीय कारणांस्तव’ मुदतवाढ देण्याच्या मागणीची याचिका सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी ज्या प्रकारे वाटेला लावली, त्यातूनही हेच वैशिष्ट्य पुन्हा दिसले.मुळात केजरीवाल यांना जामीन मिळणे, तोही ‘निवडणूक प्रचारासाठी’ मिळणे यावर आधीच टीका





झालेली आहे. दिल्लीतील मद्याविक्री परवाने देताना झालेल्या कथित भ्रष्टाचाराप्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) सुरू केलेल्या तपासानंतर सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) असा आरोप केला आहे की, केजरीवालांनी हे परवाने धोरण आखतेवेळी काहींवर मेहेरनजर करून बेकायदा १०० कोटी रुपये घेतले आणि ते गोवा निवडणुकीतील ‘आप’च्या खर्चासाठी वापरले. पण या आरोपांपेक्षाही गाजली ती, ‘केजरीवालांनी मुद्दाम निवडणुकीच्या तोंडावरच स्वत:ला अटक करवून घेतली’ अशी चर्चा! याचे कारण याप्रकरणी ‘ईडी’च्या नऊ नोटिसांना वाटाण्याच्या अक्षता लावल्यानंतर केजरीवाल ईडी-चौकशीस हजर झाले आणि त्यांना २१ मार्चपासून अटक झाली, त्याआधी १६ मार्च रोजी लोकसभा निवडणुकीची घोषणा झाली होती. पुढला सव्वा महिना कधी ईडीच्यादेणाऱ्या अगोदरच्याच याचिकेत पोटयाचिका केली की, निवडणूक प्रचारकाळासाठी तरी मला जामिनावर सोडावे. ही विनंती सर्वोच्च न्यायालयाने मान्य करताच १० मे रोजी केजरीवाल प्रचार करू लागले. त्यांच्याच पक्षातील सहकारी आणि राज्यसभा सदस्य स्वाती मालीवाल यांनी आधी विनयभंगाचा, मग गालांवर जोरदार थपडा मारल्या गेल्याचा आरोप केला, तरी त्याहीकडे लक्ष न देता केजरीवाल प्रचारात मश्गुल होते.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे केजरीवालांच्या जामिनाची मुदत १ जून रोजी संपेल आणि २ जूनच्या रविवारी त्यांना पुन्हा कोठडीत जावे लागेल, असे असताना प्रचारमग्न केजरीवालांनी जामिनास मुदतवाढीचा अर्ज केला तोही अवघा आठवडा उरला असताना. मात्र याला मूळ याचिकेतील मागणी समजले जाणार नाही, असे आधी सर्वोच्च न्यायालयाच्या रजा-काळातील न्यायपीठाने सुनावले आणि मग या जामीन-मागणीची याचिका दाखलसुद्धा करून घेता येणार नाही, असे न्यायालय-निबंधकांनी फर्मावले. कनिष्ठ न्यायालयाने जामीन नाकारला तर सर्वोच्च न्यायालयात दाद मागावी, ही पद्धतसुद्धा केजरीवाल पाळणार होते, ते निबंधकांनी होऊ दिले नाही. परिणामी पुन्हा कनिष्ठ न्यायालयात केजरीवालांना गुरुवारी जावे लागले आणि तिथेही ‘ते नेहमीच ऐन वेळी मागणी करतात’ हा ईडीचा आक्षेप मान्य करून सुनावणी १ जून रोजी ठेवण्यात आली आहे. केजरीवाल यांना जामीन मिळणे हेच एखाद्या व्यक्तीला ‘विशेष वागणूक’ देण्यासारखे आहे, असे भाजपनेते आणि देशाचे गृहमंत्री अमित शहा प्रचारकाळातील एका मुलाखतीत म्हणाले होते, तो गंभीर आक्षेप आठवल्यास आता त्याच व्यक्तीला ‘विशेष वागणूक’ नाकारली, असा अर्थ कुणी काढू शकते. मात्र १० मे रोजी न्या. संजीव खन्ना आणि न्या. दीपंकर दत्त यांनी दिलेला जामिनाचा आदेश नीट अभ्यासला तर ही ‘विशेष वागणूक’ कोणा व्यक्तीला नव्हे लोकसभा निवडणुकीचा प्रचारकाळ या परिस्थितीला देण्यात आली होती, असा उलगडा रास्तपणे होईल.

## संपादकीय »

# मेरी मर्जी!

***स्वातंत्र्याचा अर्थच मुळी निवड करण्याचा अधिकार आहे. निवड करता येत नसेल तर स्वातंत्र्याचे थेट उल्लंघन आहे.***

२०१५ मध्ये केरळमधल्या अखिला या होमिओपॅथीचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनीने इस्लाम धर्म स्वीकारला आणि ‘हादिया’ हे नाव वापरण्यास सुरुवात केली. शाफिन जहान या मित्रासोबत तिने विवाह केला. ही बाब तिच्या पालकांना समजली.न्यायालयात हादिया हजर राहिली आणि आपण आपल्या मर्जीने धर्म स्वीकारला आहे आणि स्वतःच्या इच्छेने शाफिन जहान याच्याशी विवाह केला आहे, असे सांगितले. न्यायालयाने या विवाहाचे कायदेशीर स्थानच रद्द केले. या निकालपत्रावर संमिश्र प्रतिक्रिया उमटल्या. शाफिन आणि हादिया या निकालाच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात गेले. अनेक सुनावण्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचा निर्णय रद्द केला आणि हा अधिकार अनुच्छेद २१ मध्ये जगण्याच्या अधिकाराचेच अविभाज्य अंग आहे, असा सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा होता.

पॉर्नस्टार स्टॉर्मी डॅनियल्सने ट्रम्प यांच्याशी पूर्वी असलेल्या संबंधांवर केलेले भाष्य प्रसिद्धीस येऊ नये, म्हणून अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी २०१६ च्या अध्यक्षीय निवडणुकीच्या अंतिम टप्प्यात आर्थिक गैरव्यवहार केल्याची बाब न्यायालयात सिद्ध झाली आहे.

# डोनाल्ड ट्रम्प दोषी असूनही बिनधास्त!

गुरुवारी या प्रकरणाची तब्बल साडेनऊ तास सलग अंतिम सुनावणी पार पडली. यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांना सर्व ३४ आरोपांमध्ये दोषी धरण्यात आले. न्यायालयात हे सर्व घडत असताना डोनाल्ड ट्रम्प पूर्णवेळ निर्विकार चेहऱ्याने खाली मान घालून बसून होते. डोनाल्ड ट्रम्प यांना नेमकी काय शिक्षा सुनावली जाणार? याचा निर्णय अद्याप न्यायमूर्तींनी घेतलेला नाही. विशेष म्हणजे, न्यायाधीश कोर्टात आल्यापासून संपूर्ण निकाल सांगण्याची पूर्ण प्रक्रिया अवघ्या दोन मिनिटांत आटोपली! पूर्वी एका पॉर्न अभिनेत्रीबरोबर असलेले प्रकरण मिटविण्यासाठी संबंधितांना पैसे देऊन त्याविषयी हिशेबांमध्ये फेरफार केल्याचा आरोप ट्रम्प यांच्यावर होता. २०१६मधील अध्यक्षीय निवडणुकीपूर्वी आणि निवडणुकीनंतर हे प्रकार घडले होते. कुणाबरोबरही संबंध ठेवणे किंवा त्याविषयी वाच्यता होऊ नये यासाठी पैसे देणे (हश मनी) हा अमेरिकेत



मोठा गुन्हा नाही, मात्र या देयकांचे अस्तित्व मिटविण्यासाठी आर्थिक अफरातफर करणे हा तेथे गंभीर किंवा फौजदारी स्वरूपाचा गुन्हा ठरतो. अशा फौजदारी खटल्याला सामोरे जाणारे ट्रम्प हे अमेरिकेच्या इतिहासातील पहिलेच माजी अध्यक्ष ठरले आहेत. स्टॉर्मी डॅनियल्स या पॉर्न अभिनेत्रीने ट्रम्प यांच्याबरोबर पूर्वी संबंध असल्याचा दावा करून त्यासंबंधी किस्से आणि आठवणी अमेरिकेतील काही प्रकाशकांकडे प्रसिद्धीसाठी पाठविल्या होत्या. त्यांना प्रसिद्धी मिळू नये यासाठी ट्रम्प यांनी, २०१६मधील अध्यक्षीय निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात असताना स्टॉर्मी डॅनियल्सला १,३०,००० डॉलर्स दिले. हे पैसे ट्रम्प यांचे सहकारी मायकेल कोहेन यांच्यावतीने ट्रम्प यांच्या सांगण्यावरून देण्यात आले. परंतु ही देयके कोहेन यांचे मानधन म्हणून देण्यात आल्याचे दाखवले गेले. यासंबंधी कोहेन यांच्याशी झालेल्या कराराची कागदपत्रे नकली असल्याचे न्यूयॉर्कच्या सरकारी वकिलांचे म्हणणे आहे. ट्रम्प सकृतदर्शनी दोषी केवळ स्टॉर्मी डॅनियल्स हश मनी प्रकरणातच आढळले आहेत. काही प्रकरणे उजेडात आली आहेत. या सगळ्या प्रकरणांच्या प्रसिद्धीचे हक्क असलेल्या प्रकाशकांना मोठ्या रकमा देऊन ती मिटवून टाकण्याचा आणि त्याद्वारे अप्रत्यक्षपणे २०१६ मधील निवडणूक प्रचारावर प्रभाव टाकण्याचा व्यापक कट ट्रम्प आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केला, याविषयीदेखील या खटल्यामध्ये भर देण्यात आला. ‘नॅशनल एन्क्वायरर’ या ट्रम्प यांच्याशी संबंधित असलेल्या टॅब्लॉइड पत्राने दोन प्रकरणांमध्ये ‘हश मनी’ वाटल्याचा आरोप आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# छगन भुजबळांना घरचा आहेर!

## छगन भुजबळ आणि हसन मुश्रीफ यांच्यात चांगलीच जुंपली

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**लोकसभा निवडणुकीतून माघार घेतल्यानंतर अजित पवार गटाचे नेते छगन भुजबळ पक्षात नाराज असल्याचं सातत्याने समोर येत आहे. प्रचारसभांना दांडी मारणे इथपासून तर विरोधी पक्षातील नेत्यांची बाजू घेणे इथपर्यंतच्या काही घटनांमुळे ते नाराज असल्याच्या चर्चा सातत्याने होत असतात. मनुस्मृती जाळण्याच्या प्रकरणात जितेंद्र आव्हाड यांच्यावर चौफेर टीका झाली. भाजपा आणि त्यांच्या इतर मित्र पक्षांनी जितेंद्र आव्हाडांवर तोंडसुख घेतलं. परंतु, अजित पवार गटाचे नेते छगन भुजबळ यांनी मात्र जितेंद्र आव्हाडांचं समर्थन केलं. यामुळे छगन भुजबळांना आता त्यांच्याच महायुतीतील नेत्यांकडून घरचा आहेर मिळतोय. या निमित्ताने छगन भुजबळ आणि हसन मुश्रीफ यांच्यात चांगलीच जुंपली आहे.**



शालेय पाठ्यपुस्तकात मनुस्मृतीतील श्लोक घेणार असल्याची घोषणा शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी केली होती. त्यांच्या घोषणेनंतर जितेंद्र आव्हाड यांनी संताप व्यक्त केला. त्यामुळे त्यांनी महाड येथील चवदार तळे येथे जात मनुस्मृती जाळण्याचा कार्यक्रम हाती घेतला. यावेळी त्यांच्या हातात असलेल्या पुस्तिकेवर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचेही छायाचित्र होते. त्यामुळे मनुस्मृतीची प्रत जाळताना त्यांच्या हातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची विटंबना झाली. याबाबतचे वृत्त बाहेर येताच त्यांच्यावर चौफेर टीका होऊ लागली. भाजपा, शिंदे गट, अजित पवार गटाने जितेंद्र आव्हाडांविरोधात एल्गार पुकारला. त्यांच्याविरोधात निषेध मोर्चे काढण्यात आले. परंतु, याबाबत छगन भुजबळ यांना विचारले असता छगन भुजबळांनी जितेंद्र आव्हाडांची पाठराखण केली. त्यांच्याकडून नजरचुकीने बाबासाहेबांच्या प्रतिमेची विटंबना झाली असून याबाबत त्यांनी माफीही मागितली आहे. त्यामुळे यावरून मूळ मुद्द्याला दुर्लक्षित व्हायला नको. श्लोकच्या माध्यमातूनही मनुस्मृतीचा चंचूप्रवेशही नको, अशी भूमिका छगन भुजबळांनी मांडली.गेल्यावर्षी राष्ट्रवादीत फूट पडल्यानंतर अजित पवार आणि शरद पवार गटातील नेत्यांच्या मधून विस्तव जात नव्हता. दोन्ही गटातील नेते एकमेकांवर आगपाखड करत होते. मात्र, याप्रकरणात अजित पवार गटाचे नेते छगन भुजबळ यांनी शरद पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाड यांची बाजू घेतल्याने महायुतीत धुसफूस सुरू झाली आहे. यावरून अजित पवार गटाचे नेते हसन मुश्रीफ यांनी छगन भुजबळांवर टीका केली."तुम्हाला मनुस्मृती जाळायची होती तर ते पुस्तक जाळून खाक करा. तुम्ही जाळण्याचं ठरवलंत तर मग त्यावर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा फोटो छापण्याची गरज काय? आमचे नेते छगन भुजबळ यांनी मनुस्मृतीचा विषय बाजूला पडेल म्हणून पाठिंबा देण्याचं वक्तव्य केलं. या परिस्थितीत त्यांनी आव्हाडांना खडेबोल सुनावले पाहिजे होते. त्यांना अशा पद्धतीने केलं ते चुकीचं आहे, हे सांगण्याची आवश्यकता होती. भुजबळांनी जे केलं ते फार दुर्दैवी आहे", असं हसन मुश्रीफ म्हणाले.

### हसन मुश्रीफ काय म्हणाले?

"तुम्हाला मनुस्मृती जाळायची होती तर ते पुस्तक जाळून खाक करा. तुम्ही जाळण्याचं ठरवलंत तर मग त्यावर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा फोटो छापण्याची गरज काय? आमचे नेते छगन भुजबळ यांनी मनुस्मृतीचा विषय बाजूला पडेल म्हणून पाठिंबा देण्याचं वक्तव्य केलं. या परिस्थितीत त्यांनी आव्हाडांना खडेबोल सुनावले पाहिजे होते. त्यांना अशा पद्धतीने केलं ते चुकीचं आहे, हे सांगण्याची आवश्यकता होती. भुजबळांनी जे केलं ते फार दुर्दैवी आहे", असं हसन मुश्रीफ म्हणाले.

शालेय पाठ्यपुस्तकात मनुस्मृतीतील श्लोक घेणार असल्याची घोषणा शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी केली होती. त्यांच्या घोषणेनंतर जितेंद्र आव्हाड यांनी संताप व्यक्त केला. त्यामुळे त्यांनी महाड येथील चवदार तळे येथे जात मनुस्मृती जाळण्याचा कार्यक्रम हाती घेतला. यावेळी त्यांच्या हातात असलेल्या पुस्तिकेवर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचेही छायाचित्र होते. त्यामुळे मनुस्मृतीची प्रत जाळताना त्यांच्या हातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची विटंबना झाली. याबाबतचे वृत्त बाहेर येताच त्यांच्यावर चौफेर टीका होऊ लागली. भाजपा, शिंदे गट, अजित पवार गटाने जितेंद्र आव्हाडांविरोधात एल्गार पुकारला. त्यांच्याविरोधात निषेध मोर्चे काढण्यात आले. परंतु, याबाबत छगन भुजबळ यांना विचारले असता छगन भुजबळांनी जितेंद्र आव्हाडांची पाठराखण केली. त्यांच्याकडून नजरचुकीने बाबासाहेबांच्या प्रतिमेची विटंबना झाली असून याबाबत त्यांनी माफीही मागितली आहे. त्यामुळे यावरून मूळ मुद्द्याला दुर्लक्षित व्हायला नको. श्लोकच्या माध्यमातूनही मनुस्मृतीचा चंचूप्रवेशही नको, अशी भूमिका छगन भुजबळांनी मांडली.गेल्यावर्षी राष्ट्रवादीत फूट पडल्यानंतर अजित पवार आणि शरद पवार गटातील नेत्यांच्या मधून विस्तव जात नव्हता. दोन्ही गटातील नेते एकमेकांवर आगपाखड करत होते.

---

# बोलायला नाही, कर्तृत्व दाखवायला हिंमत लागते

## देवेंद्र फडणवीसांचं विरोधकांना प्रत्युत्तर; सादर केली आकडेवारी!

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अंतिम टप्प्यात आलेल्या असताना महाराष्ट्रात महायुती आणि महाविकास आघाडी या दोन्ही बाजूंनी विजयाचे दावे केले जात आहेत. त्याचवेळी विधानसभा निवडणुकांसाठीची रणनीती सर्वपक्षांकडून आखली जाऊ लागली आहे. दुसरीकडे मनुस्मृतिविरोधातील आंदोलनादरम्यान घडलेल्या प्रकारानंतर जितेंद्र आव्हाडांनी जाहीर माफी मागितल्यानंतर त्यावर राजकीय वर्तुळातून पडसाद उमटू लागले आहेत.**

सत्ताधारी गट आव्हाडांना लक्ष्य करत असताना छगन भुजबळांनी मात्र आव्हाडांची बाजू घेतली आहे. त्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी कन्याकुमारी येथे ध्यानधारणेला सुरुवात केल्यापासून महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळातूनही त्यावर प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये देशातील थेट परकीय गुंतवणूक ३.५ टक्क्यांनी घसरली असली तरी राज्यपातळीवर गुंतवणूक आकर्षित करण्यात महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर आहे. केंद्रीय औद्योगिक आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभागाने (डीआयपीपीटी) गुरुवारी थेट परकीय गुंतवणुकीबाबतचा




अहवाल प्रसिद्ध केला. या अहवालानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक्सवर पोस्ट टाकून विरोधकांना टोला लगावताना महाराष्ट्रातील गुंतवणुकीची माहिती दिली आहे.'बोलायला नाही, कर्तृत्व दाखवायला हिंमत लागते', असा टोला विरोधकांना लगावत देवेंद्र फडणवीस यांनी ही माहिती दिली आहे. "एफडीआय आकर्षित करण्यात महाराष्ट्र २०२२-२३ मध्ये प्रथम क्रमांकावर राहिल्यानंतर आता २०२३-२४ या आर्थिक वर्षात सुद्धा पहिल्या क्रमांकावर आला आहे. केंद्र सरकारच्या डीपीआयआयटीने काल ३० मे रोजी ही आकडेवारी जाहीर केली. या आकडेवारीनुसार, महाराष्ट्राने गेल्यावर्षीपेक्षा अधिक परकीय गुंतवणूक यावर्षी प्राप्त केली आहे", असे देवेंद्र फडणवीस यांनी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये लिहिले आहे.२०२२-२३ या आर्थिक वर्षात १,१८,४२२ कोटी तर २०२३-२४ या वर्षात १,२५,१०१ कोटींची गुंतवणूक महाराष्ट्रात आली आहे. या आर्थिक वर्षातील गुंतवणूक ही गुजरातमध्ये प्राप्त झालेल्या एकूण गुंतवणुकीपेक्षा दुपटीहून अधिक आहे, तर दुसऱ्या क्रमांकावरील गुजरात आणि तिसऱ्या क्रमांकावरील कर्नाटकच्या एकूण बेरजेपेक्षाही अधिक आहे.

### प्रमुख देशांमधून गुंतवणुकीचा प्रवाह कमी

विदेशी गुंतवणूक ३३.४ टक्क्यांनी वाढून १२.३८ अब्ज डॉलरवर पोहोचली, जी मागील वर्षीच्या याच कालावधीत ९.२८ अब्ज डॉलर होती. भांडवली बाजारातील विदेशी गुंतवणूकही २०२२-२३ मधील ७१.३५ अब्ज डॉलरवरून कमी होत, मार्च २०२४ अखेर ७०.९५ अब्ज डॉलरपर्यंत घटली आहे. आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये देशामध्ये आतापर्यंतचा सर्वाधिक ८४.८३ अब्ज डॉलरचा परकीय गुंतवणुकीचा ओघ आला होता. सरलेल्या आर्थिक वर्षात, मॉरिशस, सिंगापूर, अमेरिका, इंग्लंड, संयुक्त अरब अमिराती, केमन बेटे, जर्मनी आणि सायप्रस या प्रमुख देशांमधून गुंतवणुकीचा प्रवाह कमी राहिला.

# निकालापूर्वी काँग्रेसकडून जल्लोषाची तयारी!

## काँग्रेसने 1 क्विंटल लाडूची ऑर्डरही देण्यात आल्याची माहिती

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**लोकसभा निवडणूक अगदी शेवटच्या टप्प्यात आहे. १ जून रोजी सातव्या टप्प्याचे मतदान पार पडल्यानंतर ४ जून रोजी निकाल जाहीर होणार आहे. या निवडणुकीनंतर पंतप्रधान मोदी हे तिसऱ्यांदा पंतप्रधान बनतील, असा विश्वास भाजपाकडून व्यक्त केला जातो आहे. तर देशात इंडिया आघाडीचं सरकार येईल, असं विरोधकांचे म्हणणं आहे. अशातच मध्यप्रदेश काँग्रेसने निकालापूर्वीची जल्लोषाची तयारी पूर्ण केली आहे. त्यासाठी १ क्विंटल लाडूची ऑर्डरही देण्यात आल्याची माहिती आहे.**



मध्यप्रदेशामध्ये लोकसभेच्या एकूण २९ जागा आहेत, त्यापैकी २७ जागांवर काँग्रेसने निवडणूक लढवली आहे. या निवडणुकीत काँग्रेसला १० पेक्षा जास्त जागा मिळतील, असा अंदाज वर्तवला जातो आहे. याशिवाय मध्यप्रदेश काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जीतू पटवारी यांनीही काँग्रेसला दुहेरी संख्येत विजय मिळेल, असा विश्वास व्यक्त केला आहे.विशेष म्हणजे २०१९ च्या निवडणुकीत काँग्रेसला केवळ एका जागेवर विजय मिळवता आला होता. त्यापूर्वी २०१४ मध्ये काँग्रेसला केवळ २ जागा मिळाला होत्या. २०२३ च्या अखेरीस झालेल्या विधानसभा निवडणुकीतही काँग्रेसला पराभवाचा सामना करावा लागला होता. असे असतानाही आता काँग्रेसने यंदाच्या निवडणुकीत विजयाचा विश्वास व्यक्त केला आहे. त्यासाठी काँग्रेसकडून जल्लोषाची तयारीदेखील सुरू करण्यात आली आहे. काँग्रेसने निकालाच्या दिवसासाठी १ क्विंटल लाडूची ऑर्डर दिली आहे. तसेच काँग्रेसच्या अनेक कार्यकर्त्यांनी भोपाळला पोहोचण्यासाठी रेल्वेचे तिकीटही बूक केले आहे. यासंदर्भात बोलताना मध्यप्रदेश काँग्रेसचे प्रवक्ते अब्बास हाफीज म्हणाले, मागील १० वर्षात भाजपने लोकांच्या हिताची कामं केली असती, तर त्यांनी विजयाचा जल्लोष करण्याची आणखी एक संधी मिळाली असती, मात्र, आता ते शक्य नाही. मध्यप्रदेशमध्ये भाजपाचा पराभव निश्चित आहे. भाजपाने आता आत्मपरिक्षण करण्याची गरज आहे. काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साह आहे. विजयाचा आनंद साजरा करण्यासाठी आमच्या कार्यकर्त्यांनी भोपाळमध्ये पोहोचण्याची तयारी केली आहे. त्यासाठी त्यांनी रेल्वेच्या तिकिटही बूक केल्या आहेत. तसेच १ क्विंटल लाडूची ऑर्डरही देण्यात आली आहे. हा जल्लोष केवळ मध्यप्रदेशपुरता मर्यादित नसून देशभर होणार आहे. कारण देशात इंडिया आघाडीचे सरकार येणार आहे.दरम्यान, यावरून भाजपानेही काँग्रेसला टोला लगावला आहे. "पंतप्रधान नरेंद्र मोदी हे ४ जून रोजी पुन्हा एकदा पंतप्रधान होतील आणि मोदी सरकार तिसऱ्यांदा सत्तेवर येईल. काँग्रेसला त्याचा आनंद साजरा करायचा असेल तर त्यांचे स्वागत आहे. मोदींच्या नेतृत्वातील भाजपा सरकार ऐतिहासिक आणि प्रचंड बहुमताने विजयी होणार आहे, अशी प्रतिक्रिया मधप्रदेश भाजपाच्या मीडिया सेलचे प्रमुख आशिष अग्रवाल यांनी दिली. एकूण २९ जागा आहेत, त्यापैकी २७ जागांवर काँग्रेसने निवडणूक लढवली आहे. या निवडणुकीत काँग्रेसला १० पेक्षा जास्त जागा मिळतील, असा अंदाज वर्तवला जातो आहे. याशिवाय मध्यप्रदेश काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जीतू पटवारी यांनीही काँग्रेसला दुहेरी संख्येत विजय मिळेल, असा विश्वास व्यक्त केला आहे.विशेष म्हणजे २०१९ च्या निवडणुकीत काँग्रेसला केवळ एका जागेवर विजय मिळवता आला होता. त्यापूर्वी २०१४ मध्ये काँग्रेसला केवळ २ जागा मिळाला होत्या.

### 1 क्विंटल लाडूची ऑर्डर

२०२३ च्या अखेरीस झालेल्या विधानसभा निवडणुकीतही काँग्रेसला पराभवाचा सामना करावा लागला होता. असे असतानाही आता काँग्रेसने यंदाच्या निवडणुकीत विजयाचा विश्वास व्यक्त केला आहे. त्यासाठी काँग्रेसकडून जल्लोषाची तयारीदेखील सुरू करण्यात आली आहे. काँग्रेसने निकालाच्या दिवसासाठी १ क्विंटल लाडूची ऑर्डर दिली आहे. तसेच काँग्रेसच्या अनेक कार्यकर्त्यांनी भोपाळला पोहोचण्यासाठी रेल्वेचे तिकिटही बूक केले आहे. यासंदर्भात बोलताना मध्यप्रदेश काँग्रेसचे प्रवक्ते अब्बास हाफीज म्हणाले, मागील १० वर्षात भाजपने लोकांच्या हिताची कामं केली असती, तर त्यांनी विजयाचा जल्लोष करण्याची आणखी एक संधी मिळाली असती, मात्र, आता ते शक्य नाही.

# उज्वल भविष्यासाठी काँग्रेसला मतदान करावे

## मतदानापूर्वी मनमोहन सिंग यांचे जनतेला उद्देशून पत्र

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**येत्या १ जून रोजी लोकसभा निवडणुकीच्या सातव्या टप्प्यातील मतदान पार पडणार. यामध्ये पंजाबमधील १३ जागांसह ८ राज्यातील एकूण ५७ जागांसाठी मतदान होणार आहे. दरम्यान, शेवटच्या टप्प्यातील मतदानापूर्वी माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी जनतेला उद्देशून एक पत्र लिहिलं आहे. या पत्रात त्यांनी उज्वल भविष्यासाठी काँग्रेसला मतदान करावे, असं आवाहन केलं आहे.**

तसेच लोकशाही वाचवण्याची ही शेवटची संधी आहे, असं म्हणत त्यांनी मोदी सरकारवर टीकाही केली आहे."येत्या १ जून रोजी देशात सातव्या टप्प्याचे मतदान पार पडणार आहे. देशातील लोकशाही वाचवण्याची ही शेवटची संधी आहे. जनतेने या संधीचा फायदा घ्यावा आणि त्यांच्या उज्वल भविष्यांसाठी काँग्रेसला मतदान करावे", असं आवाहन मनमोहन सिंग यांनी पत्राच्या माध्यमातून केलं आहे. या पत्रात त्यांनी अर्थव्यवस्थेच्या मुद्यावरून मोदी सरकारवर टीकाही केली आहे. "नोटबंदीचा चुकीचा निर्णय, चुकीच्या पद्धतीने लागू करण्यात आलेला जीएसटी आणि करोना काळातील चुकीचं व्यवस्थापन यामुळे देशाची



अर्थव्यवस्था कमजोर झाली आहे. भाजपा सरकारच्या काळात जीडीपीचा दर ६ टक्क्यांच्याही खाली गेला आहे. यूपीए सरकारच्या काळात हा दर ८ टक्के इतका होता. देशात बेरोजगारी आणि महागाई मोठ्या प्रमाणात वाढली आहे", असे ते म्हणाले.पुढे या पत्रात त्यांनी अग्नीवीर योजनेवरूनही मोदी सरकारला लक्ष्य केलं आहे. "मोदी सरकारने सशस्त्र दलांसाठी अग्नीवीर योजना आणली. भाजपाला वाटते की देशभक्तीचं मुल्य केवळ ४ वर्ष आहे. यावरून भाजपा मनातील पोकळ देशभक्ती दिसून येते", अशी टीका त्यांनी केली.मनमोहन सिंग यांनी या पत्राद्वारे शेतकऱ्यांच्या मुद्यावरून मोदी सरकारला घेरण्याचा प्रयत्न केला आहे. "काही वर्षांपूर्वी शेतकऱ्यांनी कृषी कायद्याविरोधात आंदोलन केल होते. यात जवळपास ७५० शेतकऱ्यांचा मृत्यू झाला होता. यापैकी अनेक जण पंजाब आणि शेजारच्या राज्यातील होते. निर्दयी मोदी सरकारने आपल्या शेतकऱ्यांवर लाठीचार्ज केला. तसेच त्यांच्यावर अश्रूगोळे फेकले. पंतप्रधान मोदी यांनी २०२२ साली शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे आश्वासन दिले होते.

### लोकशाही वाचवण्याची शेवटची संधी

परंतू तसे झाले नाही. याउलट गेल्या १० वर्षातील चुकीच्या धोरणांमुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न घटले", असे ते म्हणाले. लोकशाही वाचवण्याची ही शेवटची संधी आहे, असं म्हणत त्यांनी मोदी सरकारवर टीकाही केली आहे."येत्या १ जून रोजी देशात सातव्या टप्प्याचे मतदान पार पडणार आहे. देशातील लोकशाही वाचवण्याची ही शेवटची संधी आहे. जनतेने या संधीचा फायदा घ्यावा आणि त्यांच्या उज्वल भविष्यांसाठी काँग्रेसला मतदान करावे", असं आवाहन मनमोहन सिंग यांनी पत्राच्या माध्यमातून केलं आहे.या पत्रात त्यांनी अर्थव्यवस्थेच्या मुद्यावरून मोदी सरकारवर टीकाही केली आहे.

# 'कॉफी विथ करण'च्या 'कॉफी हॅम्पर'मध्ये भन्नाट गोष्टी!



बॉलिवूड दिग्दर्शक करण जोहर हा वेगवेगळ्या कारणांमुळे चर्चेत असतो. नुकताच करणचा लोकप्रिय कार्यक्रम कार्यक्रम 'कॉफी विथ करण'चा सीझन ८ पार पडला. वेगवेगळ्या बॉलिवूड कलाकारांनी या नव्या सीझनमध्ये हजेरी लावली आणि मनसोक्त गॉसिप करत गप्पा मारल्या. गॉसिपप्रमाणेच करण जोहरचा हा चॅट शो त्याच्या खास 'कॉफी हॅम्पर'मुळेही चर्चेत असतो. कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या पाहुण्यांबरोबर 'रॅपिड फायर' राउंड खेळत करण त्या पाहुण्यांपैकी एकाचं नाव विजेता म्हणून जाहीर करतो अन् त्या व्यक्तिला करण जोहरकडून हे खास 'कॉफी हॅम्पर' देण्यात येतं. दिसायला एकदम मोठं असलेल्या या हॅम्परमध्ये सेलिब्रिटीजना नेमक्या कोणत्या भेटवस्तू मिळतात याची प्रेक्षकांना उत्सुकता असते. या हॅम्परमध्ये अत्यंत महागड्या आणि ऊंची वस्तु असतात ही गोष्ट याआधीदेखील करण जोहरने स्पष्ट केली होती.आता नुकतंच एका व्हिडीओच्या माध्यमातून करणने प्रथमच या त्याच्या खास 'कॉफी हॅम्पर'मध्ये नेमकं काय काय असतं याबद्दल खुलासा केला आहे. या हॅम्परमधील सगळ्याच गोष्टींचा उलगडा करणने केला नसला तरी प्रामुख्याने या हॅम्परमध्ये सेलिब्रिटीजना कोणत्या गोष्टी दिल्या जातात ते करणने सांगितलं आहे. करणने या व्हिडीओच्या माध्यमातून ते हॅम्पर उघडून त्यातील काही खास गोष्टी दाखवल्या आहेत. करणच्या या झकास कॉफी हॅम्परमध्ये मोबाइल फोन्स आणि गो प्रो कॅमेरासारख्या इलेक्ट्रॉनिक गोष्टी असतात. याबरोबरच काही स्कीन केअर आणि ब्युटी प्रॉडक्टही आपल्याला पाहायला मिळतात. ऊंची ब्रँडचा चहा, याबरोबरच या आठव्या सीझनच्या निमित्ताने करणने या हॅम्परमध्ये एक सुंदरसा हाताने नवलेला कॉफी मगदेखील सामील केला आहे.

# मतभेद सर्वत्र होतात : राणी



काजोल व राणी या दोघीही बॉलीवूडमधील ९० च्या दशकातील सुप्रसिद्ध अभिनेत्री आहेत. अजुनही सिनेसृष्टीत सक्रिय असलेल्या या दोघीही एकमेकींच्या नातवाईक आहेत. काजोलचे वडील शोमू मुखर्जी आणि राणीचे वडील राम मुखर्जी हे सख्खे चुलत भाऊ होते. त्या नात्याने काजोल व राणी या चुलत बहिणी आहेत. दोघींचं जवळचं नातं असलं तरी त्यांचं एकमेकींशी फार सख्य नाही. राणीने काजोलबद्दल एका मुलाखतीत प्रतिक्रिया दिली आहे. 'गॅलाटा प्लस' ला दिलेल्या मुलाखतीत राणीने काजोल व तिच्या नात्याबद्दल विधान केलं. ती म्हणाली, "मला वाटतं की कुटुंब एक अशी गोष्ट आहे जी तुमच्यासोबत कायम राहते. त्यामुळे जगाने तुमच्याकडे कुटुंबासारखं पाहणं गरजेचं असतं. मतभेद सर्वत्र होतात, पण मतभेदाचे कारणच नसेल तर मतभेद का व्हावेत? माझ्यात आणि काजोलमध्येही तेच झालं. जे झालं ते फक्त गैरसमज व एकमेकींशी नीट संवाद न साधल्याने झालं."राणीने काजोलशी असलेल्या मतभेदाबद्दल प्रतिक्रिया दिली आहे, त्यामुळे त्यांच्यातील दुरावा मिटल्याची चर्चा होत आहे. राणीच्या कामाबद्दल बोलायचं झाल्यास ती शेवटची 'मिसेस चॅटर्जी व्हर्सेस नॉर्वे' या चित्रपटात झळकली होती. सध्या ती तिच्या आगामी चित्रपटांच्या शूटिंगमध्ये व्यग्र आहे. काजोलबद्दल बोलायचं झाल्यास ती 'लस्ट स्टोरीज २' या नेटफ्लिक्सवरील चित्रपटात दिसली होती. याशिवाय तिची द ट्रायल नावाची वेब सीरिज चांगलीच गाजली होती. या दोन्ही ओटीटीवरील कलाकृती होत्या.काजोल व राणी या दोघीही बॉलीवूडमधील ९० च्या दशकातील सुप्रसिद्ध अभिनेत्री आहेत.

# प्रियंकाचा बहिणीसाठी खास मेसेज

'बिग बॉस १७' हा शो अंतिम टप्प्यात पोहोचला आहे. शोच्या ग्रँड फिनालेला अवघे चार दिवस बाकी आहेत. अंकिता लोखंडेचा पती या शोच्या फिनालेमध्ये पोहोचू शकला नाही. मुनव्वर फारुकी, मनारा चोप्रा, अभिषेक कुमार, अरुण महाशेट्टी व अंकिता लोखंडे हे टॉप पाच स्पर्धक फिनालेमध्ये पोहोचले आहेत. मनारा फिनालेमध्ये पोहोचल्यानंतर तिची बहीण व बॉलीवूड अभिनेत्री प्रियंका चोप्राने तिच्यासाठी पोस्ट शेअर केली आहे. प्रियंका चोप्रा ही मनारा चोप्राची मामेबहीण आहे.

मनारा या शोमध्ये सहभागी झाल्यानंतरही प्रियंकाने इन्स्टाग्रामवर स्टोरी पोस्ट करत मनाराला शुभेच्छा दिल्या होत्या. त्यानंतर आता मनारा फिनालेमध्ये पोहोचल्यानंतर प्रियंकाने तिचा एक फोटो पोस्ट करत तिचं अभिनंदन केलं आणि तिच्यासाठी मेसेज पाठवला आहे.प्रियंका चोप्राने मनाराचा बिग बॉसमधील एक फोटो स्टोरीला शेअर केला. "आपलं बेस्ट दे आणि बाकी सगळं विसरून जा," असं कॅप्शन दिलं आहे. तिने मनारा चोप्राला टॅग करत रेड हार्ट इमोजी पोस्ट केला आहे. यासोबत प्रियंकाने मिताली आणि तिच्या आईलाही टॅग केलं आहे.काही दिवसांपूर्वी प्रियंका चोप्राची आई मधु चोप्रा यांनीही 'बिग बॉस १७' मधील स्पर्धक

# विकी 'छावा'च्या शूटिंगमध्ये व्यस्त!

'मसान', 'उरी', 'सॅम बहादूर' अशा अनेक चित्रपटांमधून आपली भूमिका चोख साकारणारा अभिनेता म्हणजेच विकी कौशल. विकी 'छावा' या त्याच्या आगामी चित्रपटाच्या शूटिंगमध्ये व्यस्त आहे. या चित्रपटात तो छत्रपती संभाजी महाराजांची भूमिका साकारणार आहे. वर्षाच्या अखेरीस हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. अशातच विकीचा या चित्रपटातील अनसीन फोटो लिक झाला असून सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होतोय. २३ एप्रिलला विकीचे 'छावा' चित्रपटाच्या सेटवरील काही फोटोज सोशल मीडियावर व्हायरल झाले. या फोटोजमध्ये विकी मोठ्या दाढी-मिशीत दिसतोय, तर त्याचे भले-मोठे केस रुद्राक्ष माळेने वर बांधलेले दिसतायत. चाहत्यांना भुरळ पाडलीय.छावा' चित्रपटातील अभिनेत्याचा हा लूक सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होतोय.

# अनन्या पांडे आदित्य रॉय कपूरला डेट करतेय



बॉलीवूड अभिनेता चंकी पांडेची लेक अनन्या पांडे ही अभिनेता आदित्य रॉय कपूरला डेट करत आहे. दोघेही अनेकदा एकत्र व्हेकेशनला जाताना व इव्हेंट्सला जाताना पापाराझींच्या कॅमेऱ्यात कैद होतात. अनन्या व आदित्यचं नातं बॉलीवूडमधील चर्चेचा विषय आहे. आता अनन्याच्या रिलेशनशिपबाबत चंकीने प्रतिक्रिया दिली आहे. आपण आपल्या २५ वर्षांच्या मुलीवर नियंत्रण ठेवू इच्छित नाही, असं त्याने म्हटलं आहे. 'लेहरेन'ला दिलेल्या मुलाखतीत चंकीला अनन्याच्या रिलेशनशिपबद्दल आणि तिच्या मुलाखतींमध्ये ती आदित्यचा उल्लेख करते याबाबत विचारण्यात आलं. त्यावर चंकी म्हणाला, "ठीक आहे. मला वाटतं की ती २५ वर्षांची आहे, ती माझ्यापेक्षा जास्त पैसे कमावत आहे. त्यामुळे तिला हवं ते करायला ती मोकळी आहे. माझ्या २५ वर्षांच्या मुलीला तिने काय करावं हे सांगण्याची माझी हिंमत कशी होईल." चंकीने चित्रपटांमध्ये अनन्याने केलेल्या इंटिमेट सीनबद्दलही प्रतिक्रिया दिली. "मला त्या सीनबद्दल काहीच अडचण नाही. मी हॉलीवूड चित्रपटांमध्ये इंटिमेट सीन पाहिले आहेत. ते सीन करण्यात काही गैर नाही, तुम्हालाही ते स्वीकारावं लागेल," असं चंकी म्हणाला.चंकीला अनन्या व रायसा या दोन मुली आहेत. या मुली त्याच्याकडे सल्ला घेण्यासाठी येतात का? असं विचारल्यावर तो म्हणाला, "माझ्या दोन्ही मुली खरोखरच भावनाच्या (चंकीची पत्नी) खूप जवळ आहेत. जेव्हा त्यांना काही हवं असतं तेव्हा त्या मला फोन करतात, नाहीतर त्या त्यांच्या आईच्या खूप जवळ आहेत. अर्थात भावना व त्यांच्या वयात माझ्याइतकं अंतर नाही. पण जेव्हा त्यांना कोणताही सल्ला हवा असतो तेव्हा मी त्यांच्यासाठी हजर असतो."चंकीने अनन्याचं कौतुक केलं .

# आझमने मोडला कोहलीचा विक्रम!

## आझम टी-20 मध्ये सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**आयसीसी टी-२० विश्वचषक २०२४ पूर्वीच पाकिस्तानी संघाला इंग्लंडविरुद्धची टी-२० मालिका २-० ने गमावावी लागली आहे. चौथ्या टी-२० सामन्यात पाकिस्तानी संघाला इंग्लंडविरुद्ध ७ विकेट्सने पराभव स्वीकारावा लागला. या सामन्यात पाकिस्तानचे गोलंदाज आणि फलंदाज चांगलेच फ्लॉप ठरले. टी-२० विश्वचषकापूर्वी इंग्लंडविरुद्धचा पराभव पाकिस्तानी संघाला झोपेतून उठवणार आहे. मात्र या सामन्यात बाबर आझमने छोटी खेळी खेळत विराट कोहलीचा मोठा विक्रम मोडीत काढला आहे.**



इंग्लंडविरुद्धच्या चौथ्या टी-२० सामन्यात पाकिस्तान संघाचा कर्णधार बाबर आझमने २२ चेंडूत ३६ धावा केल्या. ज्यात पाच चौकार आणि एका षटकाराचा समावेश आहे. यासह तो इंग्लंडविरुद्ध टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला आहे. तो पहिल्या क्रमांकावर पोहोचला आहे. बाबरच्या आधी हा विक्रम भारतीय सुपरस्टार विराट कोहलीच्या नावावर होता. आता बाबरने कोहलीचा हा विक्रम मोडीत काढला आहे. बाबरने इंग्लंडविरुद्ध टी-२० मध्ये ६६० धावा केल्या आहेत. तर विराटने इंग्लंडविरुद्धच्या टी-२० मध्ये ६३९ धावा केल्या आहेत.इंग्लंडविरुद्धच्या टी-२० मालिकेत एकाही पाकिस्तानी फलंदाजाला चांगली कामगिरी करता आली नाही. या कारणामुळे संघाने मालिका गमावली. याआधी पाकिस्तानने आयर्लंडविरुद्धच्या टी-२० मालिकेतही एक सामना गमावला होता. बाबर आझमने बऱ्याच वेळा चांगली सुरुवात नक्कीच करुन दिली, पण चांगल्या सुरुवातीचे त्याला मोठ्या डावात रूपांतर करता आले नाही. बाबर आझमने पाकिस्तान संघासाठी ११९ टी-२० सामन्यांमध्ये ४०२३ धावा केल्या आहेत. टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ४००० धावा पूर्ण करणारा तो दुसरा फलंदाज ठरला आहे. त्याच्या आधी विराट कोहलीने ही कामगिरी केली होती.चौथ्या टी-२० सामन्यात इंग्लंडचा कर्णधार जोस बटलरने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. यानंतर प्रथम फलंदाजी करताना पाकिस्तानचा संघ १५७ धावांत सर्वबाद झाला आणि पूर्ण २० षटकेही खेळू शकली नाही. उस्मान खानने संघाकडून सर्वाधिक ३८ धावा केल्या. त्यानंतर जोस बटलर आणि फिल सॉल्ट यांनी इंग्लंडला वेगवान सुरुवात करून दिली. सॉल्टने ४५ धावा केल्या. तर बटलर ३९ धावा करून बाद झाला. इंग्लंडने तीन गडी गमावून सहज लक्ष्य गाठले. इंग्लंडविरुद्धच्या चौथ्या टी-२० सामन्यात पाकिस्तान संघाचा कर्णधार बाबर आझमने २२ चेंडूत ३६ धावा केल्या. ज्यात पाच चौकार आणि एका षटकाराचा समावेश आहे. यासह तो इंग्लंडविरुद्ध टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला आहे. तो पहिल्या क्रमांकावर पोहोचला आहे. बाबरच्या आधी हा विक्रम भारतीय सुपरस्टार विराट कोहलीच्या नावावर होता. आता बाबरने कोहलीचा हा विक्रम मोडीत काढला आहे. बाबरने इंग्लंडविरुद्ध टी-२० मध्ये ६६० धावा केल्या आहेत. तर विराटने इंग्लंडविरुद्धच्या टी-२० मध्ये ६३९ धावा केल्या आहेत. इंग्लंडविरुद्धच्या टी-२० मालिकेत एकाही पाकिस्तानी फलंदाजाला चांगली कामगिरी करता आली नाही. या कारणामुळे संघाने मालिका गमावली.

### इंग्लंडचा पाकिस्तानवर विजय

या आधी पाकिस्तानने आयर्लंडविरुद्धच्या टी-२० मालिकेतही एक सामना गमावला होता. बाबर आझमने बऱ्याच वेळा चांगली सुरुवात नक्कीच करुन दिली, पण चांगल्या सुरुवातीचे त्याला मोठ्या डावात रूपांतर करता आले नाही. बाबर आझमने पाकिस्तान संघासाठी ११९ टी-२० सामन्यांमध्ये ४०२३ धावा केल्या आहेत. टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ४००० धावा पूर्ण करणारा तो दुसरा फलंदाज ठरला आहे. त्याच्या आधी विराट कोहलीने ही कामगिरी केली होती.चौथ्या टी-२० सामन्यात इंग्लंडचा कर्णधार जोस बटलरने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. यानंतर प्रथम फलंदाजी करताना पाकिस्तानचा संघ १५७ धावांत सर्वबाद झाला आणि पूर्ण २० षटकेही खेळू शकली नाही.

# भारतीय ग्रँडमास्टर आर प्रज्ञानंदने गमावली आघाडी

## महिला गटात वैशालीने स्वीडनच्या पिया क्रॅमलिंगचा पराभव केला

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेत भारतीय ग्रँडमास्टर आर वैशाली आणि तिचा भाऊ प्रज्ञानंद यांच्यासाठी संमिश्र दिवस राहिला. महिला गटात वैशालीने स्वीडनच्या पिया क्रॅमलिंगचा पराभव केला, तर पुरुष गटात प्रग्ननंदला चौथ्या फेरीत अमेरिकेच्या हिकारू नाकामुराकडून पराभव स्वीकारावा लागला. या पराभवानंतर प्रज्ञानंद ५.५ गुणांसह चौथ्या स्थानावर घसरला आहे. विशेष म्हणजे पुरुष गटात या दिवशी सर्व सामन्यांचे निकाल लागले, परंतु प्रग्ननंदला प्रभाव पाडता आला नाही आणि तो पराभूत झाला.**




१८ वर्षीय प्रज्ञानंदने पाचवेळा विश्वविजेता मॅग्नस कार्लसनचा पराभव करून क्लासिकल गेममधील आपल्या नवोदित कारकिर्दीतील सर्वात महत्त्वाचा निकाल मिळविल्यानंतर दुसऱ्या दिवशी, भारतीय प्रज्ञानंदला जागतिक क्रमवारीत तिसऱ्या स्थानावर असलेल्या हिकारू नाकामुराकडून पराभवाचा सामना करावा लागला. नाकामुराने खेळाच्या सुरुवातीलाच आघाडी घेतली, तर प्रज्ञानंदने अपरिहार्य वाटणाऱ्या गोष्टी टाळण्याचा पुरेपूर प्रयत्न केला. पण शेवटी, त्याचा बचाव अयशस्वी झाला आणि त्याने ८६ चालीनंतर हार पत्करली, जेव्हा त्याला समजले की तो चेकमेट झाला, तेव्हा त्याने डोक्याला हात लावला.पुरुष गटात जगातील अव्वल क्रमांकाचा खेळाडू मॅग्नस कार्लसनने आपला कट्टर प्रतिस्पर्धी अमेरिकेच्या फॅबियानो कारुआनाचा पराभव केला. त्याचवेळी फ्रान्सच्या फिरोझा अलीरेझाने विद्यमान विश्वविजेत्या चीनच्या डिंग लिरेनचा पराभव केला. या स्पर्धेतील चौथ्या फेरीनंतर नाकामुरा सात गुणांसह अव्वल स्थानावर कायम आहे. तो अलिरेझापेक्षा अर्धा गुण पुढे आहे. कार्लसनचे सहा गुण आहेत.

### वैशालीने दुसरा विजय नोंदविला

या स्पर्धेतील चौथ्या फेरीनंतर नाकामुरा सात गुणांसह अव्वल स्थानावर कायम आहे. तो अलिरेझापेक्षा अर्धा गुण पुढे आहे. कार्लसनचे सहा गुण आहेत आणि तो तिसऱ्या स्थानावर आहे, तर कारुआना पाच गुणांसह पाचव्या आणि लिरेन केवळ २.५ गुणांसह शेवटच्या स्थानावर आहे. क्लासिकल गेम प्रकारात वैशालीचा हा दुसरा विजय असून तिने ७.५ गुणांची भक्कम आघाडी मिळवली आहे. या भारतीय खेळाडूने एकूण ८.५ गुण मिळवले आहेत. तिच्यानंतर महिला विश्वविजेती चीनची वेनजुन झू आणि युक्रेनची ॲना मुझीचुक संयुक्त दुसऱ्या स्थानावर आहेत. मुझीचुकने भारताच्या कोनेरू हम्पीचा पराभव करून स्पर्धेतील तिच्या पहिल्या विजयाची नोंद केली, तर वेनजुनने आर्मागेडनमध्ये तिचा देशबांधव टिंगजी लेईचा पराभव केला. सहा खेळाडूंमध्ये दुहेरी राऊंड रॉबिन पद्धतीने खेळवण्यात येत असलेल्या या स्पर्धेत अद्याप सहा फेऱ्यांचे सामने खेळायचे आहेत. लेई पाच गुणांसह चौथ्या स्थानावर आहे. हम्पी आणि क्रॅमलिंगचे प्रत्येकी तीन गुण आहेत.